महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे,तसेच,विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.६९२/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १३ नोव्हेंबर, २०१७

प्रस्तावना -

१. सिंधू एज्युकेशन सोसायटी, प्रॉपर्टी नं. ७६/३, वॉर्ड नं. ५, बावधन बु., ता.मुळशी, जि.पुणे संचलित युरेका इंटरनॅशनल स्कूल, धायरी सिंहगड रोड, ता.हवेली, जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सिंधू एज्युकेशन सोसायटी, प्रॉपर्टी नं. ७६/३, वॉर्ड नं. ५, बावधन बु., ता.मुळशी, जि.पुणे संचलित युरेका इंटरनॅशनल स्कूल, धायरी सिंहगड रोड, ता.हवेली, जि.पुणे ही नवीन शाळा (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर संस्थेने शाळेच्या प्रस्तावित ठिकाणचा संस्थेच्या मालकीचा विहित निकषाएवढ्या जमिनीचा ७/१२ चा अद्ययावत उतारा/खरेदीखत किंवा ३० वर्षे कालावधीच्या नोंदणीकृत भाडेकराराची प्रत विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्याकडे तात्काळ सादर करणे आवश्यक आहे.

(२) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९मधील तरतुदींची व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(३) शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्याआत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब)व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातलठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसारसी.बी.एस.ई. **मंडळाशी संलग्नेतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.)मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नताना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत** (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii)महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२(सन २०१३ चा ०१)मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.

(७) **यु-डायस** डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढशाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित

केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढपरवानगी प्राप्त शाळा"असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वा.म. नानल
(स्वा.म.नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जि.प. पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

Maharashtra's self-financed school under (Establishment and Regulation) Act 2012 and also granting permission for new school on a self-financed basis as well as for upgrading the accreditation of the existing school for the year 2017-18.

**Maharashtra Government**
Department of School Education and Sports
Government Resolution SFS-1017/Sr.No.692/SM-2
Madam Kama Marg, Hutatma Rajguru square,
Mantralaya, Mumbai- 400 032
Date: November 13, 2017

Preface-

1. Sindhu Education Society, Property no. 76/3, Ward no. 5, Bavdhan Bu., T. Mulshi, District Pune Run by Eureka International School, Dhayari, Sinhagad Road, Taluka Haveli, District Pune. A proposal to approve the school on a self-financing basis was submitted to the government. The approval of the said proposal was under consideration by the government.

**Government decision**-

2.1 Sindhu Education Society under the Maharashtra Self-financing Schools (Establishment and Regulation) Act, 2012 (01 of 2013), Property no. 76/3, Ward no. 5, Bavdhan Bu., T. Mulshi, District Pune Run Eureka International School, Dhayari, Sinhagad Road, Tal. Haveli, Dist. Pune New School (Primary to Higher Secondary, etc. 1st to 12th, all Branches, English Medium, CBSE) from the academic year 2017-18 with the following terms and conditions, Government permission is being granted subject to completion.

**2.2 Terms and Conditions -**

(1) The said institution shall forthwith submit to the Divisional Deputy Director of Education, Pune an up-to-date copy of the 7/12/purchase deed or registered tenancy agreement for a period of 30 years of land owned by the institution amounting to the prescribed criteria of the proposed location of the school.

(2) The said school shall comply with the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, and all rules/provisions prescribed there under from time to time.

(3) The following permission (Letter of Intent) is granted to the school management to start the school in the academic year 2017-18 after complying with the provisions of the Act, 2009.

a) Management should apply to the respective district education authorities for first approval within one month from the commencement of the academic year if all the matters required as per the prescribed rules of the government are fulfilled for establishing the school.

b) As the management has been qualified by this Government Decision for the year 2017-18, if all the items required as per the prescribed rules of the Government are not available, it will be mandatory for them to complete the said items and start the school within eighteen months from the date of this Government Decision otherwise the permission given will automatically be canceled.

Certified Translated Copy Wordsmith Language Solutions Pune 411030

c) Government decision dt. As per the comprehensive policy prescribed on June 20, 2012, CBSE In order to obtain a No-Certificate (N.O.C.) for affiliation with the Board, the school will first need to get recognition. After receiving such recognition (Recognition) from the District Education Officer (Primary) / District Education Officer (Secondary) / Education Inspector, Brihanmumbai as per paragraph (10) of the said Government decision, the institution along with the recognition letter shall apply to the Government to obtain a Certificate of Affiliation (N.O.C.) from the concerned board. After scrutinizing the said application, if the concerned school fulfils the prescribed criteria, terms, and conditions, the Board will issue a No Objection (N.O.C.) certificate to the school for affiliation.

(4) To comply with all the provisions of the Maharashtra Self-Financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 (01 of 2013) as per the orders and procedures issued by the Government from time to time for the new school to which permission has been granted.

(5) The competent authority concerned shall ensure that the provisions of the Act, 2009 have been complied with and only then proceed with the first approval.

(6) No change shall be made in future in the medium, place of school etc. sought by the institution for school permission. If a school is started at a place other than the place where permission has been given by the government, the permission given by the government will automatically be considered cancelled.

(7) U-DISE Data:- While filling the information in the district-wise U-DISE (Unified District Information System for Education) regarding the new schools/ upgradation of schools permitted by this government decision, by recording in a separate category as "permitted schools on self-financed principle" U-DISE The concerned organization will be responsible for obtaining the U-DISE number. State Project D, Maharashtra Primary Education Council, Mumbai declared as Nodal Officer to take further action in this

regard. Similarly, for the information of all concerned, the institution will be required to put up a notice board outside the entrance of the school stating that a new school approved on a self-financing basis is a school with upgradation permission.

(8) The recruitment of teachers and non-teaching staff in the permitted self-financing schools should be done as per the prevailing rules and regulations of the Government.

3. The responsibility of informing the said order to the concerned institution within 15 days will be with the concerned Deputy Director of Education.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(S.M.Nanal)

Signed and Authorized by

Deputy Secretary,

Government of Maharashtra.

Copy,

1. Commissioner (Education), Maharashtra State, Pune.
2. State Project Director, Maharashtra Council of Primary Education, Mumbai.
3. Director of Education (Secondary & Higher Secondary), Maharashtra State, Pune.
4. Director of Education (Primary), Maharashtra State, Pune.
5. Divisional Deputy Director of Education, Pune.
6. Education Officer (Primary/Secondary) Z.P. Pune
7. Selection File (SM-2)

Certified Translated Copy
Wordsmith Language Solutions Pune-411030

**For copy information and proceedings,**

1. Principal, Eureka International School, Dhayari, Sinhagad Road, Tal. Haveli. District, Pune
2. Divisional Secretary, Pune Divisional Board of Education, Shivaji Nagar, Pune
3. President/Secretary, Sindhu Education Society, Property no. 76, Bavdhan Bk., Ta. Mulshi, Dist. Pune

**Copies: Civil submission for information**

1. Hon. Under Secretary (Edu. Off-1) Department of School Education and Insects, Ministry of Extension Bhavan, Mumbai-32.
2. Nivad Nasti.

Certified ★ Translated Copy ★ Wordsmith Language Solutions Pune 411030